**For online submission of application please visit click link**

http://103.224.247.116:8085/Recruitment/

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
## प्रशासन विभाग
## जाहिरात क्रमांक - १०६३ / २०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी/अस्थायी आस्थापनेवरील खालील नमूद केलेली पदे करार पध्दतीने दरमहा एकत्रित मानधनावर फक्त ६ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात भरणेबाबत, प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेप्रमाणे पदांची शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून **Online** पध्दतीने **www.pcmcindia.gov.in** या संकेत स्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्जामध्ये चुकीची अथवा खोटी माहिती सादर करणाऱ्या उमेदवारांना निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविणेत येईल. पदनाम, पदसंख्या, एकत्रित मानधन व आरक्षण खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | दरमहा एकत्रीत मानधन रक्कम (प्रत्येकी) र.रुपये | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ ज (ड) | वि मा प्र | इ मा व | आ दु घ | खुला |
| १) | पशुवैद्यकीय अधिकारी | ४ | ४०००० | १ | - | - | - | - | - | - | १ | - | २ |
| २) | उद्यान अधिकारी | ८ | ३५००० | १ | १ | १ | | | | - | १ | १ | ३ |
| ३) | सहाय्यक उद्यान अधिकारी | ८ | ३०००० | १ | १ | १ | | | | - | १ | १ | ३ |
| ४) | कनिष्ठ अभियंता – स्थापत्य | ३२ | ३५००० | ४ | २ | १ | १ | १ | १ | १ | ६ | ३ | १२ |
| ५) | सुपरवायझर | २० | २४०१० | ३ | १ | १ | - | १ | - | - | ४ | २ | ८ |
| ६) | परवाना निरीक्षक | ४ | २४०१० | १ | - | - | - | - | - | - | १ | - | २ |
| ७) | निरिक्षक | १६ | २५५०० | २ | १ | २ | | | | - | ३ | २ | ६ |
| ८) | आरोग्य सहाय्यक | १६ | २४०१० | २ | १ | २ | | | | - | ३ | २ | ६ |
| ९) | लाईव्हस्टॉक सुपरवायझर | ४ | २४०१० | १ | - | - | - | - | - | - | १ | - | २ |
| १०) | ॲनिमल किपर | ४ | २४०१० | १ | - | - | - | - | - | - | १ | - | २ |
| ११) | माळी | ५२ | २२८२० | ७ | ३ | २ | १ | २ | १ | १ | १० | ५ | २० |
| **एकूण** | | **१६८** | | | | | | | | | | | |

**१.१** वरील प्रवर्गनिहाय पदसंख्या व आरक्षण यामध्ये बदल होण्याची शक्यता असून त्याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहतील.

**२. वयोमर्यादा :-**

**२.१** उपरोक्त पदांसाठी सर्व प्रवर्गातील उमेदवारांचे वय जाहिरातीच्या दिनांकास किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक राहील. तसेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील.

३. शैक्षणिक अर्हता :-

| अक्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १) | पशुवैद्यकीय अधिकारी | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील (सर्जरी/मेडीसीन/गायनॅकॉलॉजी) या विषयातील एम.व्ही.एस.सी. ही पदव्युत्तर पदवी किंवा बी.व्ही.एस.सी. अॅण्ड ए.एच. पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२) मान्यताप्राप्त विद्यापिठाकडील सर्जरी/मेडीसीन/गायनॅकॉलॉजी लाईव्ह स्टॉक प्रॉडक्शन मॅनेजमेन्ट/ लाईव्ह स्टॉक प्रॉडक्शन टॅक्नोलॉजी या विषयातील एम.व्ही.एस.सी. ही पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असल्यास प्राधान्य.<br>३) उच्च शैक्षणीक अर्हता धारकास तसेच अनुभव असल्यास प्राधान्य राहील.<br>४) महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेकडील संगणक अर्हता असणे आवश्यक.<br>५) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| २) | उद्यान अधिकारी | १) मान्यताप्राप्त कृषी विद्यापीठाकडील बी.एस्सी (एग्रीकल्चर/हॉर्टीकल्चर) ही पदवी.<br>२) शासकीय अथवा निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थां किंवा खाजगी संस्थे मधील उद्यानातील पर्यवेक्षकीय कामाचा किमान ५ वर्षाचाअनुभव असणे आवश्यक.<br>३) उच्च शैक्षणीक अर्हता धारकास प्राधान्य राहील.<br>४) महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेकडील संगणक अर्हता असणे आवश्यक.<br>५) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ३) | सहा.उद्यान अधिकारी | १) मान्यताप्राप्त कृषी विद्यापीठाकडील बी.एस्सी (एग्रीकल्चर/हॉर्टीकल्चर) ही पदवी.<br>२) उच्च शैक्षणीक अर्हताधारकास तसेच अनुभव असल्यास प्राधान्य राहील.<br>३) महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेकडील संगणक अर्हता असणे आवश्यक.<br>४) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ४) | कनिष्ठ अभियंता-स्थापत्य | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>२)उच्च शैक्षणीक अर्हताधारकास तसेच अनुभव असल्यास प्राधान्य राहील.<br>३)महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेकडील संगणक अर्हता असणे आवश्यक.<br>४) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ५) | सुपरवायझर | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदविका.<br>२) उच्च शैक्षणीक अर्हताधारकास तसेच अनुभव असल्यास प्राधान्य राहील.<br>३) महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेकडील संगणक अर्हता असणे आवश्यक.<br>४) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ६) | परवाना निरीक्षक | १) मान्यता प्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.<br>२) शासनाची मराठी व इंग्रजी टंकलेखन परीक्षा उतीर्ण असणे आवश्यक. मराठी टंकलेखनाचा वेग ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० श.प्र.मि. असणे आवश्यक.<br>३) महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेकडील संगणक अर्हता असणे आवश्यक.<br>४) उच्च शैक्षणीक अर्हताधारकास तसेच अनुभव असल्यास प्राधान्य राहील.<br>५) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ७) | निरिक्षक | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी असणे आवश्यक.<br>२) शासनमान्य संस्थेकडील स्वच्छता निरिक्षक पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) उच्च शैक्षणीक अर्हता व अनुभव धारकास प्राधान्य राहील.<br>४)महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेकडील संगणक अर्हता असणे आवश्यक.<br>५) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ८) | आराग्य सहाय्यक | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी असणे आवश्यक.<br>२) शासकीय अथवा निमशासकीय संस्थांमधील स्वच्छता विषयक कामातील पर्यवेक्षकीय कामाचा अनुभव आवश्यक.<br>३) उच्च शैक्षणीक अर्हताधारकास तसेच अनुभव असल्यास प्राधान्य राहील.<br>४)महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेकडील संगणक अर्हता असणे आवश्यक.<br>५) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ९) | लाईव्हस्टॉक सुपरवायझर | १) शासनमान्य संस्थेकडील पशुवैद्यकीय शास्त्रातील किमान पदविका उत्तीर्ण .<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील लाईव्हस्टॉक सुपरवायझर कोर्स उत्तीर्ण.<br>३) उच्च शैक्षणीक अर्हताधारकास तसेच लाईव्हस्टॉक सुपरवायझर पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य .<br>४)महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेकडील संगणक अर्हता असणे आवश्यक.<br>५) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

| | | |
|---|---|---|
| १०) | ॲनिमल किपर | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील पशुवैद्यकीय पदविका उत्तीर्ण.<br>२) प्राणी संग्रहालयाचे ठिकाणी कामाचा अनुभव आवश्यक.<br>३) उच्च शैक्षणीक अर्हताधारकास तसेच अनुभव असल्यास प्राधान्य राहील.<br>४)महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेकडील संगणक अर्हता असणे आवश्यक.<br>५) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ११) | माळी | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (एस.एस.सी.) आवश्यक.<br>२) माळी कोर्स आवश्यक.<br>३) अनुभव असल्यास प्राधान्य राहील.<br>४) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

## ४. अटी व शर्ती

१) करार पध्दतीने मानधनावरील नेमणुका फक्त ६ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या हंगामी स्वरुपाच्या आहेत.

२) करार पध्दतीने नियुक्ती फक्त सहा महिने कालावधीसाठी देण्यात आल्यामुळे संबंधितांस महानगरपालिकेच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशणा बाबत किंवा सामावून घेण्याबाबत व नियमित सेवेचा इतर कोणताही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल, तसेच ६ महिने नेमूणक कालावधी पूर्ण झाल्यानंतर पुन:श्च नेमणूक मिळणार नाही या सर्व बाबीचे अर्जदाराने र.रु. १००/- च्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र देण्यात यावे.

३) कागदपत्रे तपासणीस येण्या-जाण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही.

४) अर्जासोबत सादर केलेला अनुभवाचा दाखला खोटा असल्याचे निदर्शनास आल्यास तो अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही, संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

५) सर्व उमेदवारांनी कागदपत्रे तपासणीसाठी उपस्थित राहताना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या सत्य प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशीट) प्रमाणपत्र, फोटो, अनुभव प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहेत.

६) निवड प्रक्रियेसाठी कोणतीही परीक्षा अथवा मुलाखत असणार नाही. उमेदवार निवडीकरीता खालीलप्रमाणे निकष असेल.

| किमान अर्हते मध्ये नमूद केलेप्रमाणे अंतिम वर्षाची उत्तीर्ण टक्केवारी | गुण | अतिरिक्त शैक्षणिक पात्रता | गुण | शासकीय / निमशासकीय अनुभव | गुण |
|---|---|---|---|---|---|
| ४०% ते ६०% | ५० | पदवी | ३ | १ वर्ष | ३ |
| ६१% ते ८०% | ७० | पदवी + पदविका | ५ | १ ते ३ वर्ष | ५ |
| ८१% व त्यापुढील | ९० | पदव्युत्तर पदवी | १० | ३ ते ५ वर्ष | ७ |
| | | | | ५ वर्षापेक्षा जास्त | १० |

**टिप** :- १.कमाल गुण मर्यादा १०० राहील.
२.उद्यान अधिकारी या पदासाठी अनुभव बंधनकारक असल्याने अनुभवाचे गुण अनुज्ञेय राहणार नाहीत.
३.ज्या पदासाठी पदवी अर्हता आवश्यक आहे त्या पदासाठी पदवी चे गुण अनुज्ञेय राहणार नाहीत.

७) अर्ज स्विकारण्याची मुदत संपल्यानंतर कार्यालयीन कामकाजाचे ३ दिवसांत सर्व उमेदवारांची सर्व साधारण गुणवत्ता यादी मनपाचे अधिकृत वेब पोर्टलवर प्रसिध्द करण्यात येईल.

८) **पात्र उमेदवारांना १:३** या प्रमाणात गुणानुक्रमानुसार कागदपत्रे तपासणीकामी पाचारण करण्यात येईल.

९) कागदपत्रे तपासणी मध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची वरील **अ.क्र.६** येथे नमूद केलेल्या निकषाप्रमाणे निवडीसाठी कार्यवाही करण्यात येईल. यामधून जाहिरातीमध्ये नमूद केलेली पदे गुणानुक्रमे भरण्यात येईल.

१०) निवड केलेल्या उमेदवारांना मनपाने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. वरिष्ठांनी नेमून दिलेले/रुग्णालयीन/कोरोना संबंधीत काम करणेस नकार दिलेस कोणतीही पूर्वसूचना न देता मानधनावरील नेमणूक रद्द करण्यात येईल.

११) सदर पदांना महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील.

१२) उमेदवारांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.

१३) उमेदवारांची नेमणूक झालेनंतर बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय मानधन अदा केले जाणार नाही.

१४) करार पध्दतीवर नेमणुकीकरीता अर्ज करतेवेळी सर्वसाधारण उमेदवारासाठी दिनांक ०२/०९/२०२१ रोजी सर्वसाधारण उमेदवाराचे वय ३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवाराचे वय ४३ वर्षापेक्षा अधिक नसावे.

१५) नियुक्ती प्राधिकारी म्हणून मा. आयुक्त यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचा अधिकार राहील.

१६) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराचे नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१७) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही आजार उद्भवल्यास त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१८) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून आठ दिवसाच्या आत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१९) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी तसेच त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/ माहिती व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहिल.

२०) निवड झालेल्या उमेदवारांस एकत्रित मानधनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही सोयी सुविधा, हक्क व इतर आर्थिक लाभ देय राहणार नाही.

२१) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना/ दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्याची उमेदवारी/ निवड रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाल्यानंतरही कोणतीही पुर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२२) अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२३) मनपा सेवेत असताना उमेदवाराच्या चुकीमुळे मनपाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करुन घेणेत येईल.

२४) वय शैक्षणिक अर्हता, मागासप्रवर्ग, अनुभव, अंतिम परिक्षा वर्षातील गुण इत्यादि संदर्भात अर्जा मध्ये नमूद करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे नमूद केले नसल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केलेनंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

२५) कागदपत्रांचे तपासणीचे वेळी शैक्षणिक अर्हता धारण न करणे/अपूर्ण कागदपत्रे सादर करणारे उमेदवारास निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

२६) अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहितीत त्यांचा अचूक ई-मेल पत्ता व मोबाईल क्रमांक देणे बंधनकारक आहे.

२७) उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी, निवेदने, निवड व प्रतिक्षा यादी व इतर सूचना हया वेळोवेळी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरतीप्रक्रीया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तसेच याबाबत **उमेदवारांने समक्ष महापालिका कार्यालयमध्ये येवून विचारणा करू नये.**

२८) अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी दि.१७/०९/२०२१ पर्यंत ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्या पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर सर्व अर्हता धारण करणे/अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**५. अर्ज करणेची पध्दत :-**

५.१ Online अर्ज स्वीकारण्याचा कालावधी **दि.०३/०९/२०२१** रोजी सकाळी ९.४५वा. पासून ते **दि.१७/०९/२०२१** रोजी सायं. ६.१५ वा.पर्यंत राहील. अर्ज फक्त www.pcmcindia.gov.in या महापालिकेच्या संकेतस्थळावर (मुख्य पृष्ठ – भरती) किंवा (मुख्य पृष्ठ - आमच्या बद्दल – नोकरी विषयक) किंवा (HOME – ABOUT – Recruitment) ऑनलाईन पध्दतीने स्वीकारणेत येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याबाबतच्या व इतर सर्वसाधारण सूचना व सविस्तर जाहिरात महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, याचे उमेदवारांनी काळजीपूर्वक अवलोकन करुन अर्ज करावेत.

**सही/-**
(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

क्रमांक प्रशा/१२/कावि/३७५/२०२१
दिनांक - ०२/०९/२०२१

(सुभाष इंगळे)
उप आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

**For online submission of application please visit click link**

http://103.224.247.116:8085/Recruitment/